**MBANK**

## The Muslim Co-op. Bank Ltd. Pune

# बँकिंग संबंधीचा सुरक्षित अनुभव घेण्यासाठी मूलभूत सावधानता बाळगा.

तुमचे खाते/कार्ड ब्लॉक झालेले आहे, तुमच्या क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवायची आहे, कॅशबॅक पॉईंट्स/रिवॉर्ड्स मिळविणे किंवा कर्जावर कर्ज/टॉप-अप प्राप्त करणे अशी कारणे सांगून तुमचे केवायसीचे तपशील अद्यायावत करण्याच्या बहाण्याने कॉल्स/एसएमएस/ईमेल्सच्या माध्यमातून तुम्हाला लक्ष्य करणाऱ्या फसवणूकदारांपासून (धोकेबाज) सावध रहा.

अशा घोटाळ्यांना बळी पडू नका. तुमचे स्वत:चे संरक्षण करून ऑनलाईन सुरक्षित राहण्यासाठी तुम्ही काय करावे आणि काय करू नये हे आम्ही इथे सांगत आहोत:

### हे करा

- बँकेच्या संपर्क तपशिलांसाठी नेहमी बँकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या
- तुमच्या संपर्काचे तपशील बँकेकडे नेहमीच अद्यायावत करा आणि व्यवहारांसंबंधीच्या सूचना प्राप्त करण्यासाठी सबस्क्राईब करा.
- तुमच्या कॉम्प्युटरमध्ये/मोबाईलमध्ये नेहमी अस्सल अँटि-व्हायरस आणि अँटि-मालवेअर सॉफ्टवेअर इन्स्टॉल करून ते अद्यायावत ठेवा.
- तुमचा पासवर्ड स्ट्रॉंग आणि युनिक ठेवा
- तुमचा कार्ड नंबर, पासवर्ड किंवा इतर कोणतीही वैयक्तिक/संवेदनशील माहिती साठवलेली राहू नये म्हणून तुमच्या ब्राऊझरमधील ऑटोकंप्लिट सेटिंग बंद करा.
- प्ले स्टोअरमधून किंवा ॲप स्टोअरमधून कोणतेही ॲप्स डाऊनलोड करण्यापूर्वी सावध राहा.
- व्यवहार करताना तुमच्या वेब ब्राऊझरच्या स्टेटसमध्ये पॅडलॉक साईन किंवा https आहे का ते पहा.
- ज्या संदेशांमधून संवेदनशील तपशील मागितले जातात, त्यांच्यातील स्पेलिंगच्या चुका नेहमीच शोधा. त्यामळे तम्हाला खोटे संदेश शोधण्यास मदत होईल.

### हे करू नका

- पिन, पासवर्ड, ओटीपी किंवा कार्डचे तपशील यांसारखे संवेदनशील तपशील इतर कोणाला कधीही सांगू नका.
- तुमच्या बँक खात्याला ॲक्सेस करताना पब्लिक वाय-फाय किंवा मोफत व्हीपीएन (व्हर्च्युअल प्रायव्हेट नेटवर्क) / पब्लिक कॉम्प्युटर्स यांचा वापर करणे टाळा
- अज्ञात स्रोत/सेंडर (प्रेषक) आयडीकडून प्राप्त झालेल्या लिंक्सवर क्लिक करू नका.
- 12345, नावे, जन्मदिन, इत्यादींसारखे नेहमी वापरले जाणारे पासवर्ड्स ठेवू नका.
- तुमचा बँकिंग पासवर्ड कुठेही लिहून ठेवणे आणि ब्राऊझरमध्ये सेव्ह करून ठेवणे टाळा.
- रिमोट शेअरिंग ॲप्स डाऊनलोड करू नका, उदाहरणार्थ, एनीडेस्क.
- यूपीआयच्या माध्यमातून पैसे प्राप्त करण्यासाठी क्यूआर (QR) कोड स्कॅन करू नका किंवा पिन (वैयक्तिक ओळख क्रमांक) किंवा ओटीपी (वन टाईम पासवर्ड) प्रविष्ट करू नका.